कृष्णा एक्सप्रेस

www.krishnaexpress.in
19 Sep 2026 - Page 3

# उंब्रजच्या होली कॉन्व्हेन्ट स्कूलमध्ये सायबर सुरक्षेवर मार्गदर्शन

कराड : वाढत्या सायबर गुन्ह्यांच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांमध्ये डिजिटल सुरक्षितता, गोपनीयता आणि सायबर धोक्यांविषयी जागृती निर्माण करण्यासाठी उंब्रज येथील होली कॉन्व्हेन्ट इंग्लिश मिडीयम स्कूलमध्ये सायबर सुरक्षा जनजागृती सत्र घेण्यात आले. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून सायबर सुरक्षेचे महत्त्व जाणून घेतले.

सायबर मार्गदर्शन करणारे विद्यार्थी हर्षल डोळे आणि कल्याणी पाटील यांनी सोप्या भाषेत विद्यार्थ्यांशी संवाद साधला. दैनंदिन जीवनातील सायबर गुन्हे, फसवणुकीच्या आधुनिक पद्धती आणि त्यापासून स्वतःसह कुटुंबाचे संरक्षण कसे करावे, याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. सत्रात सोशल इंजिनिअरिंग, लोकेशन स्कॅम आणि ऑनलाइन गेमिंग फसवणूक या प्रकारांवर विशेष भर देण्यात आला. व्यक्तीच्या भावना, विश्वास किंवा भीतीचा गैरफायदा घेऊन वैयक्तिक माहिती, संकेतशब्द अथवा अन्य गोपनीय माहिती मिळवण्याच्या पद्धतींबाबत विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली. मोबाईलचे स्थान दर्शविण्याची सुविधा अनावश्यकपणे सुरू ठेवणे आणि सामाजिक माध्यमांवर थेट स्थानाची माहिती देणे टाळावे, असा सल्ला देण्यात आला.



ऑनलाइन खेळांच्या माध्यमातून बक्षिसे, नाणी किंवा अन्य आमिष दाखवून आर्थिक फसवणूक केली जाऊ शकते. त्यामुळे अनधिकृत खेळांचे अनुप्रयोग डाउनलोड करू नयेत, तसेच संशयास्पद दुव्यांवर क्लिक करू नये, असे आवाहन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी एकवेळ वापरला जाणारा संकेतांक, संकेतशब्द, बँक खात्याची माहिती किंवा अन्य वैयक्तिक माहिती अनोळखी व्यक्तींना देऊ नये, मजबूत संकेतशब्द वापरावेत आणि इंटरनेटचा जबाबदारीने वापर करावा, असे मार्गदर्शन करण्यात आले.

या उपक्रमासाठी हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाच्या मुख्याध्यापिका मनिषादेवी साळुंखे व सुप्रिया माने यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षिका मनिषा वाघमारे, अश्विनी थोरात आणि सुनीता माने यांचे सहकार्य लाभले.

शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, कराडचे प्राचार्य डॉ. संजीव वाघ आणि सायबर शक्ती क्लबच्या शिक्षक समन्वयक प्रा. डॉ. प्रियांका शिंदे यांचे विशेष मार्गदर्शन मिळाले. कार्यक्रमास शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.